लोकमत

# कौशल्य विकास केंद्राचे आज उदघाटन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या कार्यालयाचे उद्घाटन आज, मंगळवारी दुपारी चार वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. विद्यापीठ परिसरातील बी-फोर बंगल्यामध्ये नवीन कार्यालय करण्यात आले आहे, अशी माहिती या विकास केंद्राचे समन्वयक प्रा. ए. एम. गुरव यांनी दिले.

पुढारी

# विद्यापीठात आज कौशल्य विकास उद्योजकता केंद्र कार्यालयाचे उद्‌घाटन

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठ कौशल्य विकास उद्योजकता केंद्र कार्यालयाच्या उद्‌घाटन समारंभ मंगळवारी (दि. ९) सायंकाळी ५ वाजता बी-४ बंगला येथे होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्‌घाटन होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले आहे.

सकाळ

# 'मोडीलिपी'चे प्रवेश १५ पासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र व इतिहास अधिविभागातर्फे 'सर्टिफिकेट कोर्स इन मोडी स्क्रिप्ट' अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया १५ ते २२ मार्च दरम्यान होत आहे. शिवपूर्वकाळापासून ते स्वातंत्र्यकाळापर्यंत प्रशासनाची तसेच दैनंदिन कामकाजासाठी मराठी भाषेबरोबराच मोडी लिपी मुख्य लिपी असल्याने या काळाबाबतचा इतिहास अभ्यासण्यासाठी ही लिपी ज्ञात असल्याशिवाय संशोधन होऊ शकत नाही. तसेच या काळातील कोणत्याही प्रशासकीय नोंदीकरीताही ही लिपी ज्ञात असणे अपरिहार्य आहे. विद्यार्थी, विद्यार्थीनी, संशोधक विद्यार्थी, इतिहास अभ्यासक, इतिहास प्रेमींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलाबरी जगताप यांनी केले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात मोडी स्क्रिप्ट अभ्यासक्रम १५ पासून प्रवेश प्रक्रिया

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठ छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, इतिहास अधिविभाग यांच्यामार्फत सर्टिफिकेट कोर्स इन मोडी स्क्रिप्ट अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया १५ ते २२ मार्च या कालावधीत राबविण्यात येणार आहे. शिवपूर्वकाळ ते स्वातंत्र्यकाळापर्यंत प्रशासनाची तसेच दैनंदिन कामकाजासाठी मराठी भाषेबरोबराच मोडी लिपी मुख्य लिपी असल्याने या काळाबाबतचा इतिहास अभ्यासण्यासाठी ही लिपी ज्ञात असल्याशिवाय संशोधन होऊच शकत नाही. या काळातील कोणत्याही प्रशासकीय नोंदीकरिताही ही लिपी ज्ञात असणे अपरिहार्य आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी मिळतील. विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, अभ्यासक, इतिहासप्रेमी यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. निलांबरी जगताप यांनी केले आहे.

तरूण भारत

# 'मोडी लिपी'ची प्रवेश प्रक्रिया १५ मार्चपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र इतिहास अधिविभागच्या वतीने 'सर्टिफिकेट कोर्स इन मोडी स्क्रिप्ट' अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया १५ ते २२ मार्च या कालावधीत पूर्ण केली जाणार आहे. तरी या अभ्यासक्रमाचा विद्यार्थी विद्यार्थीनी, संशोधक विद्यार्थी, इतिहास अभ्यासक,

- प्रवेश घेण्याचे विद्यापीठ प्रशासनाकडून आवाहन

इतिहास प्रेमी, यांनी दखल घेवून, वेळेत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलाबरी जगताप यांनी केले आहे. शिवपूर्वकाळापासून ते स्वातंत्र्यकाळापर्यंत प्रशासनाची तसेच दैनंदिन कामकाजासाठी मराठी भाषेबरोबराच मोडी लिपी मुख्य लिपी आहे. समकालीन सामाजिक शास्त्राच्या विद्यार्थ्यांपुढे नोकरीच्या संधीचा अभाव ही मोठी समस्या आहे. मोडी लिपीचे ज्ञान असणारी व्यक्ती अशा कागदपत्रांचे लिप्यंतर करून समाजास आपले योगदान देऊन आपल्या उपजिविकेचा प्रश्न ही सोडवू शकतो. इच्छुकांनी छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.